आयुष्य केव्हा आणि कसं इथे येवून पोचलं होतं? आर्थिक मंदीचा फटका म्हणावं, की त्याचं कौशल्यच कमी पडलं म्हणावं? दोनतीन बऱ्यापैकी नोकऱ्यांतून ले–ऑफ झाले, मिळेल ती, मरतुकडी नोकरी पत्करावी लागली, आधीची चांगली अपार्टमेंट सोडून इथे रहायला यावं लागलं, यातच कधीतरी दोन मुलं झाली, नीलिमाची तब्येत बिघडतच गेली, आणि आता तर फक्त जगण्यासाठी धडपड करावी लागत होती, मूलभूत अस्तित्वासाठीच लढाई चालू होती. मदत तरी कोणाकडं मागणार? भारतात दोघांचेही मध्यमवर्गीय परिवार, वडील वारलेले, शिकणारी बहीणभावंडं...सगळं सोडून परत मायदेशात जाऊन नव्याने पुन्हा सगळं सुरु करावं, तर तीही उमेद कुठंतरी खचत चालली होती...आयुष्य एका अंतहीन पोकळीत सापडल्यासारखं झालं होतं! मायदेश सोडून ज्या परक्या सधन देशात सगळे मुद्दाम नशीब काढायला म्हणून येतात तिथे येवून असं दारिद्र्यात अडकून राहणं फार भयंकर असतं...

अमेरिकेत येऊन परिस्थितीच्या चक्रात अडकून पडलेल्या नितीनच्या आयुष्यात एक संध्याकाळ बदल घडवून आणते, पण हा बदल कायमस्वरूपी असतो?